डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ८३ /२०२६ दि. २२/०४/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभाग हदद्दीत फडके रोड डोंबिवली पुर्व येथे **दिनांक २५/०४/२०२६ रोजी रात्रौ २२:०० वा. ते दिनांक २६/०४/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजेपावेतो पै फ्रेडंन्स लायब्ररी डोंबिवली पुर्व, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन कल्याण डोंबिवली महानगरपालिका** तर्फे जागतिक पुस्तक दिनानिमित्ताने **Book Street** कार्यक्रम आयोजित केले आहे. सदर कार्यक्रमासाठी नेहरू रोड येथील **टिळक कॉस रोड (मोराची बाग) ते गणपती मंदीर गेट (गणपती मंदीर कॉस रोड) पर्यंत** दिनांक २५/०४/२०२६ रोजी रात्रौ २२:०० वाजेपासुन रस्त्यावर रेड कार्पेट वर बहुभाषिक पुस्तके मांडणार आहेत. सदर कार्यक्रमास डोबिंवली शहरातील अनेक नागरिक, विविध संस्था, शाळा व कॉलेज चे स्वंयसेवक उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** ठाकुर्ली ब्रिज ब्लासम शाळेचे समोरील रोडने नेहरू रोड कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गणपती मंदीर गेट जवळ, नेहरू रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व वाहने डावे वळण घेवुन गणपती मंदीर रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोडने इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** नेहरू रोडवरून टिळक कॉस रोड कडुन गणपती कॉस रोडमार्गे ठाकुर्ली ब्रिज, ब्लासम शाळेकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टिळक क्रॉस रोड, नेहरू रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची सर्व वाहने उजवे वळण घेवुन टिळक रोडने मदन ठाकरे चौक मार्गे फडके रोडने इच्छीत स्थळी जातील.
नो पार्किंग –	नेहरू रोडवरील **टिळक कॉस रोड (मोराची बाग) ते गणपती मंदीर गेट (गणपती मंदीर कॉस रोड)** दरम्यान रस्ता **''नो पार्किंग''** करण्यात येत आहे.
पर्यायी पार्किंग –	सदर रोडवरील वाहन चालकांना फडके रोडवरील आप्पा दातार चौक ते अंबिका हॉटेल कॉर्नर दरम्यान **पी १, पी २ पार्किंग** करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना **दिनांक २५/०४/२०२६ रोजी रात्रौ २२:०० वा. ते दिनांक २६/०४/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजेपावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

Scanned with CamScanner

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

Scanned with CamScanner